Exampapers247
Exampapers247

2019

**A13**

# भाषा पेपर क्र.-1 / Language Paper - 1

17251

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** — **एकूण गुण : 100**

**Standard : H.S.C.** — **Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** — **कालावधी : 3 तास**

**Nature of Paper : Conventional type** — **Time allowed : 3 hours**

*सूचना / Note :*

(i) *उमेदवाराने **भाग** - 1 मराठी व **भाग**- 2 इंग्रजीकरिता **स्वतंत्र उत्तरपुस्तिका** वापरावी.*
*Candidates should use **two separate answerbooks** for **Part** - 1 Marathi and **Part-2** English.*

(ii) ***सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*
*All questions are **compulsory**.*

(iii) *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

(iv) *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

(v) *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answerbook otherwise he/she will be penalised.*

(vi) *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/ उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If part of answer or subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

(vii) *उमेदवाराने **भाग** - 1 मराठी या उत्तरपुस्तिकेत **भाग** - 2 इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच **भाग** - 2 चे उत्तरपत्रिकेत **भाग** - 1 (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer **Part-1** Marathi Question in **Part-2** English answerbook and vice-versa, otherwise it will be overlooked.*

SEAL

**P.T.O.**

# भाग-1 मराठी ( अनिवार्य ) 50

1. **खालीलपैकी एका विषयावर 400 शब्दात निबंध लिहा.** 25

   (a) मला 'माणसाला' शोधायचे आहे.

   (b) जगाचा पोशिंदा (शेतकरी) आत्महत्येच्या विळख्यात

2. इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 15

**Steam Engine**

The symbol of industrial revolution is the steam engine. In the first century, the diamonds of Alexandria in Egypt showed that the steam has power. In his equipment, the vapor released on a hollow metal tube come out of the two tubes connected to it, and so the collection would rotate round around itself. For this industrial use of power, there were about 16 centuries. In 1696, in England Thomas Savery created a steamboat engine for draining water from the mine. The water pressure will be released in a tank in this machine, due to the conversion of heat into the water after the cooling of the vapor is reduced. This helped to remove the water from the mine into the tank. However, even if the engine could not run continuously and used to poure some water this engine would have to burn a lot of coal. The engine and the 1712 revised, engine was made by Thomas Newcomen in England. Thomas Newcomen used a cylinder sidding in his engine. Boiling water in the tank placed under the cylinder boils and constant vapor. Move led to pumping the water by the pumps, and the water came from the mines. But in this engine, when the liquid gets prophylaxis, the cylinders are very hot. So the engine's efficiency was very low. James Watt in 1765, in this engine used a separate tank to liquidate the steam. As the tank is away from the evaporator tank its temperature decreases.

Due to this, the conversion of steam into water became easier due to the absence of heat and the use of charcoal has been reduced to half. After this due to the change made by James Watt, it was possible to rotate the wheel through the mechanism and this engine. After this, due to various improvements, this engine entered various industries like textile industry from the mine. The same engine that laid the foundation of the railway industry too !

3. खालील उताऱ्याचे 1/3 शब्दात सारांशलेखन करा व योग्य शीर्षक द्या. 10

मानवी जीवनमूल्ये ही अंतिम मूल्ये होत, हे मानवतावादाचे प्रथम सूत्र आहे. मानव हा शिक्षणाने स्वत:ला बदलणारा आणि विकसित होणारा असा प्राणी आहे; स्वत:चे हित साधणे अथवा न साधणे याबाबतीत त्याला स्वातंत्र्य आहे; मानवाच्या हातातच त्याचे भवितव्य आहे; या जगातील त्याचे जीवन म्हणजे इतिहास; ऐतिहासिक परिस्थिती निर्माण करण्याचे अथवा बदलण्याचे त्याला स्वातंत्र्य म्हणजे शक्ती आहे. सत्यासत्य, हिताहित, नीतिअनीती, पवित्रापवित्र आणि व्यापक अर्थाने योग्य आणि अयोग्य काय, याचा निर्णय होत असतो तो मानवीय असतो; मानवच सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे. अशा प्रकारच्या विचारांनी प्रेरित झालेले आंदोलन मानवतावादी होय आणि अशा विचारसरणीचे मूलगामी समर्थन करणारे तत्वज्ञान मानवतावाद होय.

मानवतावादी आंदोलनाचा प्रारंभ युरोपच्या प्रबोधनकाळात झाला. प्रबोधनकाळ म्हणजे चौदावे, पंधरावे व सोळावे अशी ही तीन शतके होत. मध्ययुगीन धार्मिक ख्रिश्चन पुरोहितशाहीच्या बंधनातून मुक्त झालेल्या, मानवी जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभलेल्या व्यक्ती या प्रबोधन युगामध्ये वावरू लागल्या. या युगात माणसाच्या बुध्दिला, प्रतिभेला आणि वर्तनक्रमाला नवी दिशा प्राप्त झाली; मानवी महिम्याचे, त्याच्या अपरंपार सर्जनशक्तीचे दर्शन होऊ लागले. या युगातील या विशिष्ट व्यक्तींनी युरोपच्या प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीतील मानवी कर्तृत्वाचे दर्शन घेतले. त्यातून नवनिर्मितीची स्फूर्ती झाली. या प्राचीन युगाचेच अनुकरण करीत असता त्याची प्रतिकृती निर्माण न होता नवा इतिहास घडू लागला. काव्य, नाटक, कला, तंत्रविज्ञान या सर्वांना नवे रूप येऊ लागले. शिक्षणाला नवी दिशा मिळाली. ख्रिस्ती धर्मगुरुंच्या शिक्षणाच्या चौकटीत न बसणारा मानव्यविद्यांचा शिक्षणक्रम अमलात येऊ लागला. माणसाच्या ऐहिक जीवनमूल्यांवर भर देणारा शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणणे हा या आंदोलनाच्या कार्यक्रमाचा वैशिष्ट्यपूर्ण भाग होता. (शब्दसंख्या 225)

– तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## Part-2 English (Compulsory) 50

1. Write an essay on **one** of the following in about 400 words : 25

   (a) Terrorism

   (b) Pleasures of Friendship

2. Translate the following passage into English : 15

समाजातील निरनिराळे लोक निरनिराळ्या वस्तुंची निर्मिती करतात व यातुनच पैशांची गरज निर्माण होते. याचा अर्थ असा की वस्तू व सेवा यांसाठी लोक परस्परांवर अवलंबून असतात. स्वत:च्या गरजेपेक्षा जास्त अन्नधान्य निर्माण करणारा शेतकरी व स्वत: तयार केलेल्या खुर्च्या व टेबले यांच्या विक्रीवर उपजीविका करणारा सुतार यांचे उदाहरण घेऊ. हे स्पष्टच आहे की विनिमयाचे काही साधन मिळाल्याशिवाय शेतकऱ्याला आपल्याकडील जादा अन्नधान्य विकता येणार नाही, आणि सुताराची उपासमार होणार. त्यांच्या दृष्टीने सर्वात विनिमयाचे सुलभ साधन म्हणजे वस्तुंची अदलाबदल हे स्पष्टच आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे एका प्रकारची वस्तू काही प्रमाणात देऊन (उदा. पीठ) दुसऱ्या प्रकारची वस्तू घेणे (प्रस्तुत उदाहरणात टेबल किंवा खुर्च्या)

वस्तुंची देवाणघेवाण ही अत्यंत साध्या समाजव्यवस्थेतच यशस्वी होऊ शकते हे उघडच आहे. प्रगत समाजात आपण आपल्या गरजेच्या वस्तुंच्या मोबदल्यात आपल्याकडील वस्तू देण्याच्या आशेने अशा वस्तू घेऊन सर्वत्र जाऊ शकणार नाही.

म्हणूनच आम्हाला अशी काहीतरी गोष्ट हवी आहे की आपणाला विनिमय करण्याच्या वस्तू व सेवा यांच्यासाठी ती उपयुक्त पर्याय ठरू शकेल. यातूनच पैशांची निर्मिती झाली. यावरून असे म्हणणे क्रमप्राप्त ठरेल की कोणतीही वस्तू, पैसा किंवा चलन म्हणून वापरता येईल. फक्त या एकाच अटीवर की, त्या वस्तुचा वापर करणाऱ्या सर्वांचे त्या वस्तुच्या मूल्याबाबत एकमत असायला हवे.

भूतकाळात ज्यांचा चलन म्हणून वापर झाला त्याची उदाहरणे म्हणजे कवडी, शिंपले, नारळ, व्हेल (मासे), दात व मीठ. कुणाच्याही अपेक्षेप्रमाणे पैसा म्हणून वापरायच्या वस्तुंच्या अंगी काही विशिष्ट गुणधर्म असतात. उदाहरणार्थ - पहिली गोष्ट म्हणजे ती वस्तू सर्वांना सोयीची असली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे ती टिकाऊ-खूप काळ टिकणारी असली पाहिजे व तिसरी गोष्ट म्हणजे ती दुर्मिळ व म्हणूनच मौल्यवान असली पाहिजे. अशाप्रकारे मोठाले दगड (कारण ते अत्यंत गैरसोयीचे असतात म्हणून), फळे व वनस्पती (अखेरीस त्या खराब होतात, नासून जातात म्हणून) किंवा छोटे-वाटोळे दगड - गुळगुळीत गोटे (कारण ते सर्वत्र उपलब्ध असतात म्हणून) यांचा पैसा म्हणून वापर करण्याची अपेक्षा करता येणार नाही.

3. Write a precis of the following passage in about 1/3 of its original length and suggest a suitable title : 10

The student should look forward to his examination not as a solemn ordeal which he is compelled to go through with the prospect of a degree should he be successful, but as a means of showing his teachers and his fellows how much he has profited by the work he has done ; those who pursue knowledge in this spirit and those, be it remarked, who examine in this spirit will look forward to examination with no apprehension, not perhaps, with joy; for after all it is a bore to be examined and perhaps a greater bore to examine. But it is a necessary step for the student in gaining self-assurance and the conviction of having profited by his exertions, and for the teacher, as a means of ensuring that his instruction is not profitless to his student. In this connection I can not refrain from remarking that genius for competition which has overridden our nation of England appears to me to be misplaced. For too much is thought of the top man; very likely the second or even the tenth or it may be the fiftieth, has finer grasp of his subject and in the long run would display more talent. Let us take comfort, however in the thought that the day of examination for the sake of examination is approaching an end.

(223 words)

-oOo-

SEAL